115

कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# आदिवासी तरुणांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व मार्गदर्शन केंद्रामार्फत प्रशिक्षणाबाबतचा मूल्यांकन अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
28, क्वीन्स गार्डन, पुणे 411 001

1994

# प्रस्तावना

--------

ग्रामीण विकासाच्या कोणत्याही संकल्पनामध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे व त्यासाठी ग्रामीण व आदिवासी भागामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात होणे ही आधुनिक विकासाची गरज आहे. त्यादृष्टीने गेल्या काही वर्षात शासनाने अनेक पावले उचलेली असली तरी आदिवासींचे शिक्षणाचे प्रमाण 1991 च्या जनगणनेप्रमाणे पुरुषामध्ये 22 टक्के तर स्त्रियांमध्ये केवळ 11 टक्के असे आढळून आले. ही परिस्थिती बदलावयाची असेल तर त्यासाठी मोठया प्रमाणात शिक्षणाची संधी प्राप्त करून देणे, तसेच शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर करणेही क्रमप्राप्त ठरते. परंतू एवढेच करून भागणार नाही. कारण आदिवासी तरुणांनी जर माध्यमिक शिक्षण पूर्ण केले असेल तर त्याला रोजगाराची संधी उपलब्ध होईलच याची शाश्वती नाही व म्हणून रोजगाराच्या शोधार्थ अशाप्रकारचे शिक्षण घेतलेले तरुण रोजगारासाठी किंवा कामासाठी शहराकडे धाव घेण्यास प्रवृत्त होतात व तेथेसुध्दा त्यांना नोकरी धंदा मिळेलच याची शाश्वती नसल्याने अशा तरुणांमध्ये वैफल्याची भावना निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. ही परिस्थिती बदलावयाची असेल तर आदिवासी युवकांना माध्यमिक शिक्षणाबरोबरच किंवा त्यानंतर ताबडतोब तांत्रिक शिक्षणाची जोड देणे अत्यंत आवश्यक ठरते. तांत्रिक शिक्षणाची जोड दिल्याने आदिवासी तरुणास त्याच्या गावातच किंवा त्याच्या भागातच स्वयंरोजगार सुरू करता येऊ शकेल व त्यायोगे त्याच्या आर्थिक उन्नतीत वाढ होऊ शकेल. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय, शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे विविध व्यवसाय व तांत्रिक शिक्षणाच्या योजना गेल्या काही वर्षात सुरू केल्या गेल्या आहेत. या धोरणाप्रमाणे प्रत्येक जिल्हयामध्ये शासकीय किंवा अनुदानीत एक तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) कार्यान्वित आहे व त्यामध्ये ग्रामीण व आदिवासी युवकांना प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. केवळ आदिवासी क्षेत्राचा विचार करावयाचा झाल्यास, आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रामध्ये सध्या एकूण 15 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून त्या केवळ आदिवासी युवकांकरिता कार्यान्वित आहेत. याशिवाय संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये तांत्रिक शिक्षणासाठी अनुदानित व विनाअनुदानित मिळून 348 संस्था कार्यरत आहेत.

आदिवासी युवकांना वरील 15 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध व्यवसायावर आधारीत प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा कालावधी सर्वसाधारणपणे 1 ते 2 वर्षापर्यंतचा आहे. व्यवसाय प्रशिक्षण घेतल्यानंतरच बरेचसे आदिवासी युवकांनी स्वतःचा व्यवसाय ते ज्या भागात राहतात त्या भागातच सुरू केल्याचे दिसून येते. तर काही तरुणांनी त्यांनी घेतलेल्या व्यावसायिक प्रशिक्षणास अनुसरून खाजगी कारखान्यामध्ये किंवा संस्थेमध्ये नोकरी पत्करली आहे, असे सर्वसाधारणपणे निदर्शनास आले आहे. या सर्व बाबींचा आढावा घेण्याच्या दृष्टीने व योग्य ते समालोचन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या कल्याण मंत्रालयाच्या सूचनेप्रमाणे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेने आदिवासी तरुणांनी स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन याबाबतचा मूल्यांकन अहवाल हाती घेऊन पूर्ण केला आहे.

या मूल्यांकनाचे काम या संस्थेचे संशोधन अधिकारी श्री•व•पं•देवळे व श्री•आर•आर•साबळे, वरिष्ठ अन्वेषक यांनी पूर्ण केले आहे• मला खात्री आहे की या अहवालातील निष्कर्ष व सूचना निश्चितपणे आदिवासी भागात काम करणारे कर्मचारी व तांत्रिक शिक्षण विभागातील अधिकारी, स्वयंसेवी संस्था, संशोधन करणारे अधिकारी यांना उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे•

दिनांक- 3 सप्टेंबर,1994

स्थळ - पुणे

**§डॉ•नवीनचंद्र जैन§**
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1

# अ नु क्र म णि का


| अ.क्र | प्रकरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1. | आदिवासी तरुणांना स्वयंरोजगारा बाबत मार्गदर्शनाविषयी, व्यवसाय शिक्षणाची पूर्व प्रस्तावना | 1 ते 9 |
| 2. | पाहणीचा उद्देश व कार्यपध्दती | 11 ते 15 |
| 3. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे व्यवस्थापन | 17 ते 53 |
| 4. | क्षेत्रीय पाहणी | 55 ते 57 |
| 5. | क्षेत्रीय पाहणीवर आधारीत निष्कर्ष व विविध सूचना | 59 ते 61 |


## प रि शि ष्ट्ये


| | | |
|---|---|---|
| 1. | औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी प्रश्नावली प्रपत्र-1 | 63 ते 79 |
| 2. | आदिवासी तरुणांसाठी (लाभार्थी) प्रश्नावली प्रपत्र-2 | 81 ते 89 |

# प्रकरण 1 ले

## आदिवासी तरूणांना स्वयंरोजगाराबाबतच्या मार्गदर्शनाविषयी व्यवसाय शिक्षणाची पूर्व प्रस्तावना

1·0 उद्योगधंद्याच्या विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य हे पूर्वीपासून आघाडीवर आहे· स्वातंत्र्यपूर्व काळात वस्त्रोद्योग व किरकोळ वापराच्या वस्तु तयार करणे याचाच प्रामुख्याने समावेश होता· परंतू स्वातंत्र्त्तोर काळात मात्र देशामध्ये सर्वच भांडवली, नित्य सामुग्रीची व यंत्र सामुग्रीची निर्मिती होऊ लागली व या निर्मितीमध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर झाले· महाराष्ट्रात प्रामुख्याने रसायने व रासायनिक पदार्थ, कापड निर्मिती, विद्युत व इतर यंत्र सामुग्री, पेट्रोलियम उत्पादने, साखर, परिवहन सामुग्री, स्कुटर व मोटारीचे कारखाने, शेती उत्पादनावर आधारीत इतर अनेक कारखाने हया उद्योग गटांचा महत्वाचा वाटा आहे· महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक उत्पादन 1974-75 पासून वाढलेले आहे· औद्योगिक उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात अग्रणीय असले तरी उद्योगधंदे राज्यांमध्ये सर्वत्र सारखेच समप्रमाणात विखुरलेले नाहीत· मुख्यतः बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद या भागातच औद्योगिकीकरणाचा विस्तार झालेला दिसून येतो· अलिकडच्या काळात भांडवली वस्तु-उत्पादन उद्योग व अंतिम वस्तु उत्पादनासाठी लागणारा माल तयार करण्याच्या उद्योगधंद्यांना महत्व प्राप्त झाले आहे· अशा उद्योगात एकूण मूल्यवृध्दीच्या 66 टक्के मूल्यवृध्दी आता दिसून येते· तसेच आधुनिक शास्त्रावर आधारीत अनेक संरचना उदा·कॉम्प्युटरायझेशन, इलेक्ट्रॉनिक साधनांचे उत्पादन पध्दतीमध्ये वापर व यंत्र सामुग्रीमध्ये देखील अत्याधुनिक उपकरणांचा उपयोग होत आहे·

1·1 या सर्व औद्योगिक घटकांना निरनिराळ्या प्रकारच्या स्तरावर लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ व त्यांच्याकरिता पुर्नप्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन व जाणीवपूर्वक प्रयत्न या राज्यामध्ये सुरू आहेत· एवढेच नव्हे तर या प्रशिक्षणाच्या सोयीमध्ये प्रचंड वेगाने वाढ होत आहे· महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळी 1961 मध्ये या खात्यामध्ये 18 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून केवळ 5596 विद्यार्थ्यांची प्रशिक्षणाची सोय होती· सन 19988-89 मध्ये एकूण 189 संस्थामधून 42,844 विद्यार्थ्यांची व सन 1989-90 मध्ये एकूण 210 संस्थामधून 45,512 विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे· सन 1988-89 मध्ये ही संस्था 134 व्यवसायामध्ये निरनिराळ्या 2235 उद्योग गटातून 22,560 विद्यार्थ्यांकरिता आणि 1989-90 मध्ये ही संस्था एकूण 130 शालांत परीक्षेला तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील { 2 स्तर} इ·11 वी व इ·12 वीत व्यवसाय विषयात सोय करण्यात येऊन त्याचा लाभ उच्च माध्यमिक स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयातील अनुक्रमे सन 1988-89, 1989-90 मध्ये एकूण 47,250 विद्यार्थ्यांना मिळतो·

1.2 प्रशिक्षणाच्या सोयीबरोबरच प्रशिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र राज्यामध्ये प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये औद्योगिक प्रदर्शन भरविणे, निदेशक वर्गाकरिता कौशल्य स्पर्धा घेणे, प्रशिक्षण सुरु असतानाच उत्पादन प्रशिक्षण योजना राबविणे व अखिल भारतीय स्तरावर होणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्य स्पर्धामध्ये प्राविण्य मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे याचा समावेश होतो हे होय.

त्याचबरोबर औद्योगिक संस्थामधून देण्यात येणारे प्रशिक्षण उद्योग समूहांना पूरक असावे म्हणून निदेशक वर्गाना औद्योगिक कारखान्यात शिक्षणासाठी पाठविणे त्यांना उद्योगात प्रात्यक्षिक पाहण्यासाठी पाठवून देणे, आधुनिक यंत्रसामुग्रीची ओळख करुन देणे, त्यावर प्रशिक्षण देणे इ.कार्यक्रमही राबविण्यात येतात.

1.3 अशारितीने विशेषतः मागील दोन दशकामध्ये प्रशिक्षण विकास योजनांना गती मिळत गेल्यामुळे व्यवसाय शिक्षणाकडे एकूणच अनुसूचित जाती/जमातीसह सर्व समाज मोठया अपेक्षेने पाहत आहे. व्यवसाय शिक्षणामध्ये व प्रशिक्षणामध्ये फार जलद गतीने वाढ होत आहे व हे प्रशिक्षण समाजाची अपेक्षा पूर्ण करण्याचे महत्वाचे कार्य करीत आहे. या सर्व कार्यक्रमांचे संचलन नियोजनपूर्ण व्हावे व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाची आखणी व त्यांचे नियमन चांगले व्हावे या दृष्टीने शासनाने नव्यानेच निर्माण केलेल्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडे सोपविले आहे व हे संचालनालय महाराष्ट्रातील निरनिराळया विभागातील विभागीय कार्यालयामार्फत नेटाने व जिद्दीने काम करीत आहे.

1.4. या संचालनालयामार्फत आदिवासी युवकांनी निरनिराळया प्रकारच्या व्यवसायांचे शिक्षण घ्यावे असाही उद्देश आहे. महाराष्ट्र राज्यात खास आदिवासीकरिता सुरु करण्यात आलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येणेप्रमाणे आहेत. 1. बाणगांव 2. जव्हार 3. करंजवण, 4. नंदूरबार 5. कळवण 6. नवापूर 7. माणिकडोह 8. किनवट 9. चिखलदरा, 10. पांढरकवडा, 11. देवरी 12. गडचिरोली 13. देसाईगंज 14. अल्लापल्ली, आणि 15. राजूरा

1.5 खालील तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात खास आदिवासींकरिता सुरु करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसायनिहाय प्रवेशक्षमता दर्शविणारा तक्ता (1988-89) या वर्षाचा दिला गेला आहे.

तक्ता क्र.1.1

महाराष्ट्र राज्यात खास आदिवासींकरिता सुरू करण्यात आलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसायनिहाय प्रवेश क्षमता दर्शविणारा तक्ता (1989-90)

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | वाण गांव | जव्हार | करंज- वन | नंदूर- वार | कळवण | नवा- पूर | माणिक- डोह | किन- वट | चिखल- दरा | पांढर कवडा | देवरी | गड- चिरोली | देसाई- गंज | अल्ला पल्ली | राजूरा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. | .11. | .12. | .13. | .14. | .15. | .16. | .17. | .18 |
| 1. | सुतार | 32 | -- | 32 | 32 | -- | 16 | 32 | -- | 16 | -- | -- | 16 | -- | 16 | -- | 192 |
| 2. | लघुलेखन (मराठी) | -- | -- | -- | 32 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 32 |
| 3. | लघुलेखन (इंग्रजी) | -- | -- | -- | 32 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 32 |
| 4. | यांत्रिक डिझेल | 16 | 16 | -- | -- | -- | -- | -- | 16 | 16 | 16 | 16 | -- | 16 | -- | 16 | 128 |
| 5. | संधाता | 12 | 12 | 24 | 24 | 24 | 12 | -- | 12 | 24 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 216 |
| 6. | गवंडी | 16 | 16 | -- | -- | -- | 6 | -- | -- | 32 | 16 | 16 | 16 | -- | 16 | 16 | 160 |
| 7. | जोडारी | 32 | 16 | 64 | 32 | 32 | 16 | 32 | 16 | 32 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 368 |
| 8. | कातारी | 24 | -- | 24 | 24 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 72 |
| 9. | यांत्रिक प्रशिक्षण व वातानुकुलीकरण | 16 | -- | -- | 32 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 48 |

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | वाण गांव | जव्हार | करंज-वन | नंदूर-वार | कळवण | नवा-पूर | माणिक-डोह | किन-वट | चिखल-दरा | पांढर कवडा | देवरी | गड-चिरोली | देसाई-गंज | अल्ला फ्ली | राजूरा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. | .11. | .12. | .13. | .14. | .15. | .16. | .17. | .18 |
| 10. | वीजतंत्री | 32 | 16 | -- | 32 | 16 | 16 | -- | 1 | 32 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 256 |
| 11. | तारतंत्र | 32 | 16 | 32 | 32 | 16 | 16 | 32 | 16 | 32 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 320 |
| 12. | यांत्रिक (मोटारगाडी) | 32 | 16 | 32 | 32 | -- | 16 | 16 | 16 | 32 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 16 | 288 |
| 13. | आरेखक (यांत्रिक) | -- | 16 | -- | -- | -- | 16 | -- | -- | -- | 16 | 16 | -- | 16 | -- | 16 | 96 |
| 14. | आरेखक (स्थापत्य) | -- | -- | -- | -- | 16 | -- | -- | -- | 16 | -- | -- | 16 | -- | -- | -- | 48 |
| 15. | यांत्रिक कर्षित | -- | -- | 32 | 32 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 64 |
| 16. | पत्रे कारागिर | -- | -- | 32 | -- | -- | -- | -- | 16 | -- | -- | -- | 16 | 16 | -- | -- | 80 |
| 17. | सर्व्हेक्षक | -- | -- | -- | -- | 16 | -- | -- | 16 | 16 | -- | -- | -- | -- | 16 | -- | 64 |
| | एकूण | 244 | 124 | 272 | 336 | 120 | 124 | 112 | 124 | 248 | 124 | 124 | 140 | 124 | 124 | 124 | 2464 |

(आधार- महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अहवाल 1989 व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई)

1·6 उपरोक्त तक्त्यांमध्ये 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची व्यवसायनिहाय विद्यार्थ्यांची प्रवेशक्षमता देण्यात आली आहे· एकूण सर्व व्यवसायांची प्रवेशक्षमता 2464 आहे· त्यापैकी नंदूरबार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची प्रवेशक्षमता सर्वात जास्त म्हणजे 336 आहे· तर माणिकडोह प्रशिक्षण संस्थेची प्रवेशक्षमता सर्वात कमी म्हणजे 112 आहे·

1·7· अशारितीने महाराष्ट्र शासनाने आदिवासी विभागाखाली आदिवासी विद्यार्थ्यांसाठी एकंदर 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून 17 व्यवसायाबद्दलचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, असे नमूद करावेसे वाटते·

# प्रकरण 2 रे

## पाहणीचा उद्देश व कार्यपध्दती

2·0 आदिवासी विभागामध्ये 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत· या 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून आदिवासी व बिगर आदिवासी युवकांसाठी विविध व्यवसायास अनुसरुन बहुविध शिक्षण दिले जाते· खालील तक्त्यामध्ये व्यवसायनिहाय प्रशिक्षण कालावधी व किमान शैक्षणिक पात्रता देण्यात आलेली आहे·

तक्ता क्र·2·1

आदिवासी युवकांसाठी 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून सुरु केलेले विविध व्यवसाय, कालावधी किमान शैक्षणिक पात्रता दर्शविणारा तक्ता

| अ·क्र | व्यवसायाचे नांव | प्रशिक्षण कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| 1· | सुतार | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 2· | लघुलेखन (मराठी) | 1 वर्ष | मराठीसह 12 वी उत्तीर्ण |
| 3· | लघुलेखन (इंग्रजी) | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 4· | यांत्रिक डिझेल | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 5· | संधाता | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 6· | गवंडी | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 7· | जोडारी | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 8· | कातारी | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 9· | यांत्रिक प्रशिक्षण व वातानुकुलीकरण | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 10· | वीजतंत्री | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 11· | तारतंत्री | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 12· | यांत्रिक (मोटारगाडी) | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 13· | आरेखक (यांत्रिकी) | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 14· | आरेखक (स्थापत्य) | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 15· | यांत्रिक (कर्षित) | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा अनुत्तीर्ण |
| 16· | पत्रे कारागीर | 1 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |
| 17· | सर्व्हेक्षक | 2 वर्ष | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण |

(आधार-महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण -1989) व्यवसाय शिक्षण संचालनालय, मुंबई

2•1 उपरोक्त तक्त्यामधील 9 व्यवसाय दोन वर्ष कालावधीचे आहेत व 8 व्यवसाय एक वर्ष कालावधीचे आहेत• काही व्यवसाय अवगत केल्यानंतर आदिवासी युवकांस स्वतंत्र व्यवसाय सुरु करता येतो• तर काही व्यवसायांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शासकीय अथवा खाजगी नोकरी मिळू शकते•

2•2 आदिवासी विभागातील 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून वरील तक्त्यामध्ये दर्शविलेले 17 व्यवसायांचे शिक्षण देण्यात येते• आदिवासी युवकांनी त्यांच्या प्रशिक्षणानंतर स्वतंत्र व्यवसाय सुरु केले आहेत• अथवा शासकीय/खाजगी नोकरी सुरु केली आहे काय ? याबाबतच्या पाहणीच्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचीही माहिती प्राप्त करुन देण्यात आली आहे•

"आदिवासी तरुणांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व मार्गदर्शन केंद्रामार्फत प्रशिक्षण" मूल्यांकन अहवालासाठी मूळ उदिष्टये खालीलप्रमाणे आहेत•

2•1•1 आदिवासी तरुणांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून व्यवसाय शिक्षण घेतल्यानंतर स्वयंरोजगार सुरु करणारांचे व त्याचप्रमाणे नोकरी करणा-यांचे टक्केवारीचे प्रमाण काय आहे, याचा अभ्यास करणे•

2•2•2 आदिवासी तरुणांना औद्योगिक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थामध्ये कोणत्या शैक्षणिक व इतर शासकीय सोयी-सुविधा मिळतात याबाबत पाहणी करणे•

2•2•3 प्रस्तुत योजनेमध्ये काही उणिवा असल्यास त्यावर आधारीत उपाययोजना सुचविणे•

**पाहणीबाबत कार्यपध्दती**

---------------

2•3 अभ्यास अहवालासाठी आदिवासी विभागातील 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून लाभार्थीची माहिती गोळा करण्यात आली• ज्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून कोणत्याही व्यवसायाचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे व त्यांनी स्वतः रोजगार सुरु केला आहे, जे सध्या शासकीय/खाजगी नोकरी करीत आहेत, अशा लाभार्थीची माहिती मागविण्यात आली होती• जव्हार, कळवण व चिखलदरा औद्योगिक प्रशिक्षण संस्था वगळता इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील लाभार्थ्यांची माहिती "निरंक" आहे• याप्रमाणे जव्हारमधील 24, कळवणमधील 25 व चिखलदरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे 10 लाभार्थीची माहिती पाहणीसाठी गोळा करण्यात आली• उपरोक्त 59 लाभार्थ्यांपैकी 34 लाभार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याची प्रपत्र-2 मध्ये माहिती घेण्यात आली आहे•

**संदर्भ वर्ष :-**

2.4 पाहणीबाबत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संदर्भ वर्ष 1990-91 व 1991-92 हे निश्चित करण्यात आले. तथापि, जव्हार व कळवण औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या त्यामागील वर्षाच्या लाभार्थ्यांची माहिती प्राप्त करण्यात आली आहे.

**पाहणीसाठी पत्रके :-**

प्रपत्र क.1 2.5 पाहणीच्या उद्देशास अनुसरुन आदिवासी युवकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण दिले जाते व संस्थामध्ये कोणत्या सुविधा त्यांना मिळतात. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे एकंदर व्यवस्थापन कोणत्या पध्दतीने कार्यरत आहे, याबाबत एक प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती त्या संस्थेच्या प्राचार्यांकडून भरुन घेण्यात आली आहे. प्रश्नावलीमध्ये संस्थेबाबतची मूलभूत माहिती संस्थेमध्ये शिकविणारे विविध व्यवसाय व त्यामधील शासनाकडून मान्यताप्राप्त असलेल्या आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या, मंजूर असलेली पदे, भरलेली पदे, व रिक्त पदांची संख्या, संस्थेच्या जागेविषयी माहिती, संस्थेतर्फे आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी मासिक विद्यावृत्तीची माहिती, विद्यार्थ्यांची संख्या व विद्यार्थ्यांच्या निकालाची टक्केवारीविषयक माहिती गोळा करण्यात आली आहे.

प्रपत्र-2 2.6 मध्ये आदिवासी लाभार्थ्यासाठी हे प्रपत्र तयार केले आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांची मूलभूत माहिती आदिवासी तरुणांची कुटुंबविषयक माहिती, आदवासी लाभार्थ्याने सुरु केलेल्या स्वतंत्र व्यवसाय व नोकरीची माहिती, आदिवासी तरुणांनी सुरु केलेल्या व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाबाबतची माहिती इ.चा समावेश आहे.

**क्षेत्रीय पाहणी :-**

2.7 क्षेत्रीय पाहणी जव्हार (ठाणे जिल्हा) कळवण (नाशिक जिल्हा) व चिखलदरा (अमरावती जिल्हा) या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना व प्रत्यक्ष लाभार्थीना भेटी देऊन पूर्ण करण्यात आली आहे. प्रपत्र-2 मध्ये त्यांच्याबाबत माहिती मिळविण्यात आली आहे. क्षेत्रीय पाहणीचे काम एप्रिल व मे महिन्यामध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

# प्रकरण ३ रे

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे व्यवस्थापन

3.0 आदिवासी विभागातील एकूण 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रपत्र-1 मध्ये माहिती प्राप्त झाली आहे. खालील दिलेल्या तक्त्यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची मूलभूत माहिती देण्यात आली आहे.

तक्ता क्र.३.१

## आदिवासी विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबाबत मूलभूत माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | संस्थेच्या प्राचार्याचे नांव | संस्था स्थापनेचे वर्ष | जवळचे रेल्वेस्टेशन | संस्थेच्या परिसरातील इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था | संस्थेतील कार्यालयीन कर्मचारी | | संस्थेतील शिक्षक/कर्मचारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पुरुष | स्त्रीया | पुरुष | स्त्रीया |
| 1. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था गडचिरोली | श्री.सु.बा.श्रीकोंडवार | ऑगस्ट,1984 | मूल,ता.मूल, जि.चंद्रपूर | देसाईगंज,अल्लापल्ली | 4 | 1 | 25 | -- |
| 2. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था देवरी | श्री.गि.चि.हरदास | ऑगस्ट,1984 | आमगांव,जि.भंडारा | औ.प्र.संस्था,भंडारा | 6 | -- | 14 | -- |
| 3. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजूरा | श्री.उमेश परशुराम हेडावू | सप्टेंबर,1989 | बल्लारशाह,चंद्रपूर | राजूर तालुक्यात नाही | 11 | -- | 11 | -- |
| 4. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखलदरा | श्री.नि.शा.जुनोनकर | ऑगस्ट,1981 | अचलपूर,जि. अमरावती | -- | 5 | -- | 22 | -- |
| 5. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था माणिकडोह | श्री.एम.एम.मोरे | नोव्हेंबर,1977 | पुणे | -- | 6 | -- | 14 | -- |
| 6. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था अल्लापल्ली | श्री.अ.दा.हजारे | ऑगस्ट,1984 | बल्लारपूर,जि.चंदूपूर | औ.प्र.संस्था,गडचिरोली | 6 | -- | 15 | -- |
| 7. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था जव्हार | श्री.एन.एम.निकम | सप्टेंबर,1984 | डहाणू,जि.ठाणे | औ.प्र.संस्था,वसई, बाणगांव | 18 | -- | 16 | -- |
| 8. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळवण | श्री.जे.व्ही.चौधरी | 1984 | मनमाड | नाही | 4 | -- | 12 | -- |

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | संस्थेच्या प्राचार्यांचे नांव | संस्था स्थापनेचे वर्ष | जवळचे रेल्वेस्टेशन | संस्थेच्या परिसरातील इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था | संस्थेतील कार्यालयीन कर्मचारी | | संस्थेतील शिक्षक/ कर्मचारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पुरुष | स्त्रीया | पुरुष | स्त्रीया |
| 9. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था करंजवण | श्री.शि.म.पाठक | जून,1977 | नासिकरोड | दिंडोरी, तालुक्यात अन्य संस्था नाही. | 8 | 1 | 27 | 1 |
| 10. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था किनवट | श्री.पं.ज.कांबळे | 27.9.1984 | किनवट | -- | 7 | -- | 15 | -- |
| 11. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था वाणगांव | श्री.एच.आर.शेगर | ऑगस्ट, 1975 | प.रेल्वे वाणगांव | औ.प्र.संस्था, चिंचणी माहिम | 7 | -- | 30 | -- |
| 12. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था नवापूर | श्री.व्ही.आर.तायडे | 1984 | नवापूर रे.स्टेशन | --- | 7 | -- | 14 | -- |
| 13. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था पांढरकवडा | श्री.अनिल रेड्डीवार | ऑगस्ट,1984 | वणी,जि.यवतमाळ | औ.प्र.संस्था, वणी | 3 | 2 | 28 | -- |
| 14. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था नंदूरबार | श्रीनिवास नारायण भगरे | ऑगस्ट,1976 | नंदूरबार | --- | 10 | -- | 32 | 2 |
| 15. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देसाइगंज | --- | माहिती प्राप्त झाली नाही. | | | | | | |
| | एकूण | | | | | 102 | 4 | 275 | 3 |

3·1 वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या परिसरात इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत त्या संस्था काही अनुदानित व काही शासकीय आहेत· सर्व संस्थेतील कार्यालयीन कर्मचारी पुरुष 102 व स्त्रिया 4 आहेत· प्राचार्यासह सर्व संस्थेतील शिक्षण कर्मचारी पुरुष 275 व स्त्रिया 3 आहेत· औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजूरा सोडून बाकी सर्व संस्था एक दशकाच्या आसपास कार्यरत आहेत· औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजूरा, चंद्रपूर जिल्हयाच्या विशेष कृती कार्यक्रमाखाली स्थापन झाली आहे·

3·2 संस्थेमध्ये शिकविण्यात येणारे विविध व्यवसाय, त्यांची मंजूर विद्यार्थी संख्या व शिक्षण घेत असलेले एकूण व आदिवासी विद्यार्थी संख्या सन 1990-91 व 1991-92 याबाबतची माहिती गोळा करण्यात आली व खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात येत आहे·

तक्ता क्र·3·2

संस्थेमध्ये शिकविण्यात येणारे विविध व्यवसाय, त्यांची मंजूर विद्यार्थी संख्या व शिक्षण घेणा-यांची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ·क्र· | व्यवसायाचे नांव | एकूण मंजूर विद्यार्थी संख्या | 1990-91 | | | | 1991-92 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण विद्यार्थी | आदिवासी | एकूण विद्यार्थीनी | आदिवासी | एकूण विद्यार्थी | आदिवासी | एकूण विद्यार्थीनी | आदिवासी |
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· | ·7· | ·8· | ·9· | ·10· | ·11 |
| 1· | सुतार | 192 | 204 | 69 | -- | -- | 184 | 69 | -- | -- |
| 2· | लघुलेखन (इंग्रजी) | 32 | 35 | 2 | 7 | 1 | 34 | 3 | 3 | -- |
| 3· | लघुलेखन (मराठी) | 32 | 33 | 15 | 9 | 4 | 33 | 28 | 8 | 1 |
| 4· | यांत्रिक डिझेल | 112 | 123 | 75 | -- | -- | 117 | 81 | -- | -- |
| 5· | संधाता | 222 | 250 | 149 | -- | -- | 253 | 145 | -- | -- |
| 6· | गवंडी | 160 | 151 | 50 | -- | -- | 132 | 30 | -- | -- |
| 7· | जोडारी | 384 | 361 | 151 | -- | -- | 290 | 148 | -- | -- |
| 8· | कातारी | 84 | 77 | 37 | -- | -- | 70 | 35 | -- | -- |
| 9· | यांत्रिक प्रशिक्षण व वातानुकूलीकरण | 48 | 48 | 18 | -- | -- | 44 | 27 | -- | -- |
| 10· | वीजतंत्री | 272 | 283 | 173 | -- | -- | 208 | 123 | -- | -- |

पुढे चालू ···

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | एकूण मंजूर विद्यार्थी संख्या | 1990-91 एकूण विद्यार्थी | 1990-91 आदिवासी | 1990-91 एकूण विद्यार्थीनी | 1990-91 आदिवासी | 1991-92 एकूण विद्यार्थी | 1991-92 आदिवासी | 1991-92 एकूण विद्यार्थीनी | 1991-92 आदिवासी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. | .11 |
| 11. | तारतंत्री | 320 | 301 | 181 | -- | -- | 272 | 159 | -- | -- |
| 12. | यांत्रिक {मोटार} | 286 | 290 | 182 | -- | -- | 260 | 173 | -- | -- |
| 13. | आरेखक {यांत्रिक} | 80 | 79 | 30 | 1 | -- | 46 | 27 | 9 | 5 |
| 14. | आरेखक {स्थापत्य} | 48 | 52 | 28 | 7 | 2 | 35 | 18 | 4 | 3 |
| 15. | यांत्रिक {कर्षित} | 64 | 89 | 46 | -- | -- | 75 | 46 | -- | -- |
| 16. | सर्वेक्षक | 64 | 70 | 26 | -- | -- | 31 | 11 | 2 | -- |
| 17. | पत्रे कारागिर | 80 | 88 | 14 | -- | -- | 103 | 37 | -- | -- |
| 18. | यंत्र कारागिर | 12 | 14 | -- | -- | -- | 12 | -- | -- | -- |
| 19. | रेडिओ व दूरचित्रवाणी | 16 | 19 | 3 | 2 | -- | 14 | 3 | 2 | 8 |
| 20. | यांत्रिक इलेक्ट्रॉनिक्स | 16 | 20 | 25 | 2 | 1 | 18 | 13 | 2 | 1 |
| | एकूण | 2526 | 2587 | 1264 | 28 | 8 | 2231 | 1176 | 30 | 19 |
| | टक्केवारी | | 102.41 | 48.85 | | 28.57 | 88.32 | 52.71 | | 63.06 |
| | टक्केवारी | | | 50.03 | | | | 46.55 | | |

नोट :- रकाना क्र.4 व 8 मध्ये 1990-91 व 1991-92 या वर्षाची एकूण विद्यार्थी संख्या दर्शविण्यात आली आहे. रकाना क्र.5 व 9 मध्ये एकूण विद्यार्थ्यांपैकी आदिवासी विद्यार्थी आहेत. बाकी राहिलेली बिगर आदिवासींची संख्या आहे.

3.3 आदिवासी विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून सध्या 19 विविध व्यवसाय शिकविले जातात. विद्यार्थ्यांची एकूण मान्य असलेली संख्या 2526 आहे. वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन 1990-91 या वर्षामध्ये एकूण मंजूर असलेल्या विद्यार्थ्यांशी सध्या असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 102.41 इतके आहे. सन 1991-92 या वर्षामध्ये हे प्रमाण 88.32 इतके आहे. सन 1990-91 व 1991-92 मध्ये एकूण विद्यार्थ्यांपैकी आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे 48.85 टक्के व 52.71 टक्के होते. त्याप्रमाणे एकूण विद्यार्थीनीपैकी आदिवासी विद्यार्थीनींचे प्रमाण 28.57 टक्के व 63.06 आहे.

3.4 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कर्मचारीवृंदाबाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे. संस्थामधील मंजूर पदांची संख्या, भरलेली पदे, रिक्त पद संख्या अशाप्रकारची माहिती खालील तक्त्यामध्ये देण्यात येत आहे.

तक्ता क्र.३.३

## मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | पदांचे नांव | मंजूर पदसंख्या | भरलेली पदसंख्या | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | प्राचार्य | 14 | 14 | -- |
| 2. | गट निदेशक | 17 | 17 | -- |
| 3. | शिल्प निदेशक | 179 | 164 | 15 |
| 4. | चित्रकला निदेशक | 18 | 17 | 1 |
| 5. | गणित निदेशक | 15 | 13 | 2 |
| 6. | संलग्न व्यवसाय निदेशक | 13 | 10 | 3 |
| 7. | रजा रक्षित निदेशक | 12 | 6 | 6 |
| 8. | मोटार वाहनचालक निदेशक | 13 | 10 | 3 |
| 9. | कार्यालय अधीक्षक | 8 | 7 | 1 |
| 10. | मुख्य लिपिक | 14 | 12 | 2 |
| 11. | टिप्पणी सहायक | 9 | 8 | 1 |
| 12. | लेखापाल | 13 | 13 | -- |
| 13. | कनिष्ठ लिपिक | 24 | 23 | 1 |
| 14. | भांडारपाल | 16 | 15 | 1 |
| 15. | मिश्रक | 12 | 8 | 4 |
| 16. | कर्मशाला परिचर | 24 | 22 | 2 |
| 17. | भांडार परिचर | 13 | 13 | -- |
| 18. | चतुर्थश्रेणी कर्मचारी | 147 | 144 | 3 |
| 19. | वरिष्ठ लिपिक | 11 | 9 | 2 |
| 20. | लिपिक तथा टंकलेखक | 9 | 8 | 1 |
| 21. | ट्रेसर | 2 | - | 2 |
| 22. | अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी | 4 | 2 | 2 |
| 23. | मील राईट निदेशक | 3 | - | 3 |
| 24. | वनोपचारक | 3 | 1 | 2 |
| 25. | आरेखक (यांत्रिकी) | 2 | 2 | -- |
| 26. | यांत्रिकी रेडियो व दूरचित्रवाणी | 1 | 1 | -- |
| 27. | इलेक्ट्रॉनिक्स | 1 | 1 | -- |
| | एकूण | 597 | 540 | 57 |

3.5 उपरोक्त तकत्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजूर असलेल्या पदांची संख्या 597 आहे. त्यापैकी 540 पदे भरलेली आहेत. रिक्त पदांची संख्या 57 आहे. रिक्त असलेल्या पदांची आकडेवारी 9.5 टक्के आहे.

3.6 संस्थेच्या जागेविषयी माहिती देताना असे दिसून येते की, 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेपैकी 5 औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्वतःच्या प्रशासकीय इमारतीमध्ये आहेत. 9 संस्थांना स्वतःची प्रशासकीय इमारत नाही. संस्थेच्या 8 इमारतीमध्ये वर्कशॉप, वर्गखोल्या, वाचनालय इ.स्वतंत्र आहेत. बाकीच्या 6 संस्थेच्या जागेमध्ये अशी सोय दिसून येत नाही. त्याचप्रमाणे शिक्षक व प्रशिक्षणासाठी स्वतंत्र खोल्या संस्थेच्या 7 इमारतीमध्ये आहेत. तर उर्वरित 7 संस्थेच्या इमारतीत तशी सोय उपलब्ध नाही. प्रशिक्षणार्थ्यासाठी वसतीगृह फक्त 5 संस्थेकडे उपलब्ध आहेत. 9 संस्थांना वसतीगृहे नाहीत. दोन औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये कर्मचा-यांसाठी राहण्यासाठी घरे उपलब्ध आहेत. बाकीच्या 12 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ही सुविधा उपलब्ध नाही. आठ संस्थांकडे खेळांसाठी मैदानाची सोय आहे. तर उर्वरित 6 संस्थांना अशी सोय उपलब्ध नाही. 14 पैकी एकूण 10 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी इमारती भाड्याने घेतलेल्या आहेत. एकूण दरमहा भाड्यापोटी रू.27,012/- खर्च होतात.

3.7 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी मासिक शिष्यवृत्तीची माहिती मागविण्यात आली आहे. ही माहिती 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची आहे.

तक्ता क.3.4

14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थातर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी

मासिक शिष्यवृत्ती दर्शविणारा तक्ता

| प्रकार | विद्यार्थी संख्या | संस्थेतर्फे रुपये | इतर खात्यातर्फे रुपये | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. |
| 1 डेस्कॉलर | 916 | 32,320=00 | 42,000=00 | 74,320=00 |
| 2 हॉस्टेलिअर | 207 | 3,320=00 | 22,120=00 | 25,440=00 |
| एकूण | 1,123 | 35,640=00 | 64,120=00 | 99,760=00 |

3•8 उपरोक्त तक्त्यास अनुसरुन डे स्कॉलरच्या प्रत्येक विद्यार्थ्यास सरासरी रु•80/- पडतात व हॉस्टेलियरच्या प्रत्येक विद्यार्थ्यास रु•122/- पडतात•

3•9 औद्योगिक प्रशिक्षण संस्थातर्फे बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची देण्यात येणारी शिष्यवृत्तीची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे•

तक्ता क्र•3•5

बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना मासिक/वार्षिक शिष्यवृत्तीची
माहिती दर्शविणारा तक्ता

| बिगर आदिवासी विद्यार्थी संख्या | मासिक रुपये | वार्षिक रुपये |
|---|---|---|
| •1 | •2• | •3• |
| 580 | 24,720=00 | 2,96,640=00 |

3•10 वरील तक्त्यास अनुसरुन प्रत्येक बिगर आदिवासी विद्यार्थ्यास सरासरी रु•40/- मासिक शिष्यवृत्ती दिली जाते•

3•11 याशिवाय 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये इतर खाजगी संस्थामार्फत व खात्यामार्फत मिळण्यात येणा-या शिष्यवृत्तीची माहिती खालील तक्त्यामध्ये दिली आहे•

तक्ता क्र•3•6

आदिवासी/बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना खाजगी संस्थामार्फत
व खात्यामार्फत मिळणा-या शिष्यवृत्तीची माहिती

| प्रकार | | संख्या | मासिक रुपये | वार्षिक रुपये |
|---|---|---|---|---|
| •1 | | •2• | •3• | •4• |
| 1• | आदिवासी संख्या | 459 | 14,260=00 | 1,71,120=00 |
| 2• | बिगर आदिवासी संख्या | 269 | 9,420=00 | 1,13,040=00 |
| | एकूण | 728 | 23,680=00 | 2,84,160=00 |

3•12 इतर खाजगी संस्थामार्फत व खात्यामार्फत प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्यास सरासरी रु•31/- मिळतात• त्याचप्रमाणे बिगर आदिवासी विद्यार्थ्यास रु•35/- दर महिन्यास मिळतात•

3•13 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची विद्यार्थ्यांच्या गळतीबाबतची माहिती घेण्यात आली• विविध व्यवसायामध्ये संस्थेने प्रवेश दिलेल्या आदिवासी, बिगर आदिवासी तरुणांच्या गळतीबाबतची माहिती वर्ष 1990-91 व 1991-92 ची खालील तक्त्यात देण्यात आलेली आहे•

तक्ता क्र·3·7

विविध व्यवसायामध्ये संस्थेने प्रवेश दिलेल्या आदिवासी तरुणांच्या गळतीबाबतची माहिती- वर्ष 1990-91 व 1991-92

| विविध व्यवसायामध्ये एकूण प्रवेश दिलेल्या आदिवासी/बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या | | | | त्यापैकी व्यवसाय मध्येच सोडून दिलेल्या अथवा गळती झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1990-91 | | 1991-92 | | 1990-91 | | 1991-92 | | 1990-91 | | 1991-92 | |
| आदिवासी | बिगर आदिवासी | आदिासी | बिगर आदिवासी | आदिवासी | बिगर आदिवासी | आदिवासी | बिगर आदिवासी | आदिवासी | बिगर आदिवासी | आदिवासी | बिगर आदिवासी |
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· | ·7· | ·8· | ·9· | ·10· | ·11· | ·12· |
| 1172 | 1204 | 1086 | 923 | 389 | 271 | 266 | 213 | 33 | 22 | 24 | 23 |

3•14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सुध्दा गळतीचे प्रमाण बरेच आहे• तक्त्यावरून असे स्पष्ट होते की 1990-91 साली आदिवासी विद्यार्थ्यामध्ये हे गळतीचे प्रमाण 33 टक्के आहे• त्याचप्रमाणे बिगर आदिवासीमध्ये 22 टक्के आहे• 1991-92 वर्षामध्ये आदिवासी विद्यार्थ्यातील गळतीचे प्रमाण 24 टक्के आहे व बिगर आदिवासी विद्यार्थ्यामध्ये हेच प्रमाण 23 टक्के आहे• दोन्ही वर्षाची टक्केवारी पाहता आदिवासी विद्यार्थ्यामध्ये हे गळतीचे प्रमाण जास्त आहे, असे दिसून येते• गळतीबाबतची विविध कारणे दिली गेली आहेत ती येणेप्रमाणे आहेत• 1• सतत गैरहजर राहणे 2• घरगुती अडचणी 3• नोकरी लागल्यामुळे 4• वसतीगृह नसल्यामुळे 5• पावसाळयात गैरहजर राहिल्यामुळे 6• आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनेक संधी उपलब्ध झाल्यामुळे 7• आर्थिक अडचणीमुळे इत्यादी•

3•15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील व्यवसायाला परीक्षेस बसणा-या व त्यापैकी उत्तीण होणा-या आदिवासी विद्यार्थ्याच्या निकालाची टक्केवारीची माहिती गोळा करण्यात आली आहे• ही माहिती खालील तक्त्यात देण्यात येत आहे•

तक्ता क्र.3.8

विविध व्यवसायानुसार आदिवासी विद्यार्थ्यांच्या निकालाची टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| अ.नं | व्यवसायाचे नांव | आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेत बसणा-याची संख्या | | ह्यापैकी परीक्षेत पास होणा-यांची संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 1. | जोडारी | 49 | 94 | 28 | 67 | 57 | 71 |
| 2. | वीजतंत्री | 50 | 84 | 31 | 44 | 62 | 52 |
| 3. | यांत्रिक मोटारगाडी | 84 | 94 | 63 | 56 | 75 | 60 |
| 4. | तारतंत्री | 58 | 110 | 41 | 45 | 71 | 41 |
| 5. | यांत्रिक इलेक्ट्रॉनिक्स | -- | 15 | -- | 7 | -- | 47 |
| 6. | यंत्र कारागिर | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 7. | कातारी | 8 | 20 | 4 | 18 | 50 | 90 |
| 8. | पत्रे कारागिर | 12 | 28 | 7 | 14 | 58 | 50 |
| 9. | सुतारकाम | 51 | 75 | 20 | 39 | 39 | 52 |
| 10. | संधाता | 102 | 128 | 25 | 33 | 25 | 26 |
| 11. | गवंडी | 30 | 25 | 6 | 6 | 20 | 24 |
| 12. | आरेखक स्थापत्य | 19 | 3 | 8 | 1 | 42 | 33 |

| अ.नं | व्यवसायाचे नांव | आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेत बसणा-याची संख्या | | ह्यापैकी परीक्षेत पास होणा-यांची संख्या | | टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 13. | यांत्रिकी रेडिओ व टी.व्ही. | -- | 3 | -- | 3 | -- | 100 |
| 14. | आरेखक यांत्रिकी | 3 | 23 | 3 | 9 | 100 | 39 |
| 15. | यांत्रिकी डिझेल | 80 | 92 | 29 | 35 | 36 | 38 |
| 16. | सर्व्हेक्षक | 12 | 15 | 2 | 11 | 16 | 73 |
| 17. | यांत्रिक कर्षित | 27 | 31 | 2 | 3 | 7 | 10 |
| 18. | लघुलेखन इंग्रजी | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 19. | लघुलेखन मराठी | 12 | 21 | 7 | 19 | 58 | 90 |
| 20. | यांत्रिक, प्रशिक्षण व वातानुकुलीकरण | 1 | 4 | 1 | 3 | 100 | 75 |
| | एकूण | 598 | 865 | 277 | 413 | 46 | 47 |

3•16 विविध व्यवसायामध्ये सन 1990-91 व 1991-92 वर्षामध्ये परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची संख्या 598 व 865 आहे• त्यापैकी परीक्षेत उत्तीर्ण होणा-यांची संख्या 277 व 413 आहे• विद्यार्थ्यांची एकूण निकालाची टक्केवारी 46 व 47 टक्के आहे• हे प्रमाण सर्वसाधारण दिसून येते•

3•17 विविध व्यवसायाला परीक्षेस बसणा-या बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची सन 1990-91 व 1991-92 ची माहिती गोळा करण्यात आली• त्याचप्रमाणे उत्तीर्ण झालेल्यांची संख्या व निकालाची टक्केवारी खालील तक्त्यामध्ये देण्यात येत आहे•

## तक्ता क्र.3.9

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या, विविध व्यवसायनिहाय परीक्षेस बसणा-या, उत्तीर्ण होणा-या व त्यांच्या निकालाची टक्केवारी दर्शविणारा तक्ता - सन 1990-91 व 1991-92

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेस बसणा-यांची संख्या | | त्यापैकी परीक्षेस पास होणा-यांची संख्या | | निकालाची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 1. | पत्रे कारागिर | 60 | 69 | 41 | 34 | 68 | 49 |
| 2. | सुतारकाम | 118 | 86 | 84 | 48 | 71 | 56 |
| 3. | संधाता | 109 | 111 | 50 | 47 | 46 | 42 |
| 4. | गवंडी | 81 | 98 | 43 | 31 | 53 | 32 |
| 5. | यांत्रिक इलेक्ट्रॉनिक्स | 12 | 21 | 8 | 19 | 67 | 90 |
| 6. | यांत्रिक रेडिओ व टि.व्ही | -- | 7 | -- | 5 | -- | 71 |
| 7. | यंत्र कारागिर | -- | 10 | -- | 7 | -- | 70 |
| 8. | कातारी | 13 | 31 | 12 | 27 | 92 | 87 |
| 9. | जोडारी | 77 | 125 | 63 | 99 | 82 | 79 |
| 10. | वीजतंत्री | 44 | 68 | 32 | 43 | 73 | 63 |

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेस बसणा-यांची संख्या | | त्यापैकी परीक्षेस पास होणा-यांची संख्या | | निकालाची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 | 1990-91 | 1991-92 |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 11. | यांत्रिक मोटारगाडी | 44 | 63 | 29 | 42 | 66 | 67 |
| 12. | तारतंत्री | 59 | 78 | 36 | 48 | 61 | 62 |
| 13. | आरेखक स्थापत्य | 15 | 2 | 12 | -- | 71 | -- |
| 14. | यांत्रिक डिझेल | 58 | 46 | 24 | 22 | 41 | 48 |
| 15. | आरेखक यांत्रिकी | 10 | 35 | 7 | 14 | 70 | 40 |
| 16. | सर्व्हेक्षक | 25 | 14 | 11 | 9 | 44 | 64 |
| 17. | यांत्रिक कर्षित | 37 | 38 | 10 | 11 | 27 | 29 |
| 18. | लघुलेखन इंग्रजी | 31 | 34 | 4 | 19 | 13 | 56 |
| 19. | लघुलेखन मराठी | 21 | 15 | 12 | 13 | 57 | 87 |
| | एकूण | 816 | 951 | 478 | 538 | 58.57 | 56.57 |

3•18 विविध व्यवसायामध्ये सन 1990-91 व 1991-92 या वर्षामध्ये परीक्षेस बसणा-या बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची एकूण संख्या 816 व 951 आहे• त्यापैकी उत्तीर्ण होणा-यांची संख्या 478 व 538 आहे• निकालाची एकूण टक्केवारी 59 व 57 टक्के आहे• हे प्रमाण आदिवासी विद्यार्थ्यांपेक्षा 13 व 10 टक्क्यांनी जास्त आहे, असे निदर्शनास येते•

## प्रकरण 4 थे

--------

## क्षेत्रीय पाहणी

----------

4.0 आदिवासी तरुणांना स्वयंरोजगाराबाबत प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक संस्थामधून मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जाते. आदिवासी विभागाच्या 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून स्वयंरोजगार सुरु केलेल्या अथवा प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या लाभार्थ्यांची माहिती मागविण्यात आली होती. 15 औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी ही माहिती या संस्थेस पाठविली आहे. सन 1990-91 व 1991-92 या दोन वर्षाची ही माहिती आहे.

4.1 जव्हार औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये 24 लाभार्थी तर कळवण, चिखलदरा, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रत्येकी 25 व 10 लाभार्थींची यादी प्राप्त करण्यात आली होती. इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची माहिती निरंक आहे. त्यामुळे जव्हार, कळवण व चिखलदरा येथे प्रत्यक्ष भेट देऊन व लाभार्थींची भेट घेऊन प्रपत्र भरुन देण्यात आले आहे. 59 लाभार्थ्यांपैकी 34 लाभार्थीच सर्व्हेक्षणाच्या कालावधीत उपलब्ध होऊ शकले. क्षेत्रीय पाहणीमध्ये प्रामुख्याने ज्या बाबी निदर्शनास आल्या होत्या त्याविषयी खालीलप्रमाणे उहापोह करण्यात आला आहे.

4.1.1 उपलब्ध झालेल्या 34 लाभार्थ्यांपैकी 26 टक्के लाभार्थी स्वयंरोजगार अथवा व्यवसाय करतात. 47 टक्के लाभार्थी नोकरी करतात. तर 27 टक्के लाभार्थी विना व्यवसाय आहेत, असे निदर्शनास आले आहे.

4.1.2 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेणारे आदिवासी तरुण दारिद्रय रेषेखालील असलेल्या कुटुंबांतून आलेले आहेत, असे आढळून आले आहे.

4.1.3 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सध्या मिळत असलेले विद्यावेतन प्रत्येकी रु.60/- महिन्यास म्हणजे फारच अपूरे आहे, असे वाटते.

4.1.4 ब-याचश्या आदिवासी युवकांना प्रशिक्षण कालावधीमध्ये वसतीगृहाची सोय नाही, असे दिसते.

4.1.5 क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या कळवण, जि.नाशिक, जव्हार, जि.ठाणे व चिखलदरा, जि.अमरावती औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून कोकणा, भिल्ल, वारली, कोरकू व ठाकूर या आदिवासी जमातीचे युवक प्रशिक्षण घेत आहेत, असे निदर्शनास आलेले आहे.

4•1•6 क्षेत्रीय पाहणीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, आदिवासी युवक प्रशिक्षण घेतलेला व्यवसाय सोडून नोकरीसाठी कारकून, टंकलेखक इ•सेवामध्ये काम करीत आहे•

4•1•7 बहुसंख्या आदिवासी युवक दारिद्रय रेषेखालील कुटुंबांतून आल्यामुळे व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांना आर्थिक मदत हवी असते• आर्थिक मदतीशिवाय हे युवक त्यांनी प्रशिक्षण घेतलेला व्यवसाय सुरू करू शकत नाहीत• ही अडचण लक्षात घेऊन हे युवक नोकरी शोधण्याच्या मार्गाचा अवलंब करीत असतात, असे क्षेत्रीय पाहणीमध्ये आढळून येते•

4•1•8 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी फक्त 5 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना शासकीय इमारत आहे• त्याचप्रमाणे 14 औद्योगिक प्रशिक्षण संस्थापैकी 12 औद्योगिक प्रशिक्षण संस्थमध्ये शिक्षक व इतर कर्मचा-यांसाठी घरे उपलब्ध नाहीत•

4•1•9 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये संभाव्य गळतीबाबतच्या कारणांचा शोध घेतला असता असे दिसून येते की, प्रशिक्षण कालावधीमध्ये नोकरी अथवा रोजगार मिळण्याच्या निमित्ताने काहीजण मध्येच प्रशिक्षण सोडून जातात• त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असणे हे देखील त्यांच्या गळतीबाबतचे महत्वाचे कारण आहे• त्यांच्यामध्ये प्रशिक्षणाची आवड नसणे हे देखील महत्वाचे कारण आहे•

4•1•10 शासनाच्या अनुशेष भरण्याच्या धोरणानुसार व आदिवासी विद्यार्थ्यांना नोकरी मिळत असल्यामुळे गळतीचे प्रमाण अधिक आहे, असे दिसून येते•

4•1•11 क्षेत्रीय पाहणीमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून जे विद्यार्थी बाहेर पडतात, त्यांनी त्यांच्या व्यवसायाच्या शिक्षणास अनुसरुन स्वयंरोजगार सुरु केला आहे, अथवा शासकीय/खाजगी नोकरीवर आहेत अथवा घरीच शेती व्यवसाय करतात, याबाबतची माहिती प्राप्त होत नाही• व्यवसाय शिक्षण संचालनालयानी त्यांच्या अधिनस्त असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अशाप्रकारची माहिती ठेवण्याविषयी सूचना द्याव्यात• याबाबत जरूर वाटल्यास माजी विद्यार्थ्यांशी पत्रव्यवहार करुन अशी माहिती गोळा करणे आवश्यक ठरते• स्वयंरोजगार सुरु करणा-या आदिवासी विद्यार्थ्यांची निश्चितपणे टक्केवारी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हे अपरिहार्य वाटते•

# प्रकरण - 5 वे

## क्षेत्रीय पाहणीवर आधारीत निष्कर्ष व विविध सूचना

5•0 आदिवासी विभागामध्ये कार्यरत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामार्फत आदिवासी युवकांना विविध व्यवसायामध्ये प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते• जव्हार, कळवण व चिखलदरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील 34 लाभार्थींची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याकडून प्रश्नावलीतील माहिती घेण्यात आली असता खालीलप्रमाणे निष्कर्ष व सूचना प्रतिपादन करणे गरजेचे आहे, असे निदर्शनास आले आहे•

5•1 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सध्या आदिवासी व इतर युवकांना मिळत असलेले विद्यावेतन प्रत्येकी रु•60/- दरमहा हे अत्यंत अपूरे आहे, असे प्रतिपादन करावेसे वाटते• या विद्यावेतनाप्रित्यर्थ कमीत कमी 250/- दरमहा प्रत्येक विद्यार्थ्यास मिळणे आवश्यक आहे•

5•2 औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेत असलेले बहुसंख्य आदिवासी युवक हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबियामधूनच असल्या कारणाने त्यांना वसतीगृहे व भोजनाची व्यवस्था पुरविणे अगत्याचे आहे, असे दृष्टीपथास येते•

5•3 आदिवासी युवक दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांमधून आल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणीमुळे स्वयंरोजगार सुरू करणे अशक्यप्राय होते• वित्तीय संस्थांनी व बँकांनी आदिवासी युवकांना व्यवसाय सुरु करण्यामध्ये कर्ज त्वरीत उपलब्ध करून घ्यावे, असे वाटते• तसेच जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिका-यांनी आदिवासी युवकांची आर्थिक प्रकरणे त्वरीत निकाली काढावीत, म्हणजे त्या युवकांना स्वयंरोजगार सुरू करणे सुलभ होईल•

5•4 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिघातून साधारणतः 15 ते 20 कि•मी•दूर असलेल्या गांवामधील आदिवासी तरूण जर त्या संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी असतील तर संस्थेने त्या युवकांना येण्या-जाण्यासाठी सायकली पुरवाव्यात• संस्थेसाठीच्या तरतूदीमध्ये सायकल खरेदी करण्याची तरतूद नसेल तर शासनाकडे तसा प्रस्ताव सादर करावा• शासनानेही यासाठी निधि उपलबध करून द्यावा, म्हणजे आदिवासी युवकांची गैरसोय होणार नाही•

5•5 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विशेषतः दूरच्या गांवामधून प्रशिक्षण घेण्यासाठी येणा-या आदिवासी युवकांसाठी शासनाने अथवा संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने या युवकांसाठी वसतीगृह व भोजनाची व्यवस्था उपलब्ध करून घ्यावी, असे येथे नमूद करावेसे वाटते•

5•6 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या शिक्षक व इतर कर्मचा-यांसाठी शासनाने त्यांना राहण्यास. उपलब्ध करून द्यावीत•

5•7 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे व्यवसायनिहाय निकाल समाधानकारक लागण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत•

5•8 प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी विद्यार्थ्यांना शासनाने खेळासाठी मैदानाची जागा उपलब्ध करून द्यावी•

5•9 प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्था अथवा संचालक, व्यवसाय शिक्षण व मार्गदर्शन संचालनलायाने प्रतिवर्षी गुणानुक्रमाने उत्तीर्ण होणा-या आदिवासी युवकांसाठी स्वयंरोजगार सुरु करण्याच्या दृष्टीने कर्ज मिळवून देण्यासाठी वित्तीय संस्था व जिल्हा उद्योग केंद्राकडे प्रयत्न करावेत• आदिवासी युवकांना स्वयंरोजगार सुरू करण्याविषयी त्यांच्या मनामध्ये त्यामुळे उत्साहन निर्माण होईल• वित्तीय संस्थांनीही ही बाब प्राधान्याने हाताळावी, असे अपेक्षित आहे•

5•10 आदिवासी युवक हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांमधून येत असल्या कारणाने व्यवसाय शिक्षण संचालनालयाने व जिल्हा औद्योगिक केंद्राच्या अधिका-यांनी गुणानुक्रमाने उत्तीर्ण होणा-या स्वयंरोजगाराबाबत सविस्तरपणे माग्रदर्शन करावे• त्याचप्रमाणे उद्योजकासाठी लागणारी जागा, कच्चा माल, मूलभूत सोयी-सवलती व कर्ज त्यांना मिळवून देण्याबाबत सर्वतोपरी सहकार्य करणे आवश्यक आहे, असे वाटते• त्यादृष्टीने प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा आहे•

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, 28, राणीचा बाग,**
**पुणे 411 001**

आदिवासी तरुणांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व मार्गदर्शन केंद्रामार्फत प्रशिक्षण याबाबतचा मूल्यांकन अहवाल

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी प्रश्नावली

### चौक क्र•1

संस्थेबाबत मूलभूत माहिती :=

1• अ• संस्थेचे नांव व पत्ता :-

ब• संस्थेच्या प्राचार्याचे नांव :-

2• संस्थेचे स्थापनेचे वर्ष :-

3• जवळचे रेल्वे स्टेशन :-

4• संस्थेच्या परिसरातील इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्था :-

5• संस्थेतील कार्यालयीन कर्मचारी :- पुरुष स्त्रिया

6• संस्थेतील शिक्षक कर्मचारी (प्राचार्यासह) :- पुरुष स्त्रिया

## चौक क्र•2

संस्थेमध्ये शिकविण्यात येणारे विविध व्यवसाय, त्यांची मंजूरसंख्या व शिक्षण घेत असलेले एकूण विद्यार्थी संख्या सन 1990-91 व 1991-92

| अ• क्र• | व्यवसायाचे नांव | एकूण मंजूर विद्यार्थी संख्या | शिक्षण घेत असलेली एकूण विद्यार्थी संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1990-91 | | | | 1991-92 | | | |
| | | | एकूण विद्यार्थी | आदिवासी | एकूण विद्यार्थीनी | आदि-वासी | एकूण विद्यार्थी | आदि-वासी | एकूण विद्यार्थीनी | आदिवासी |
| •1• | •2• | •3• | •4• | •4अ• | •5• | •5अ | •6• | •6अ | •7• | •7अ• |
| 1• | सुतार | | | | | | | | | |
| 2• | लघुलेखन ॥मराठी॥ | | | | | | | | | |
| 3• | लघुलेखन ॥इंग्रजी॥ | | | | | | | | | |
| 4• | यांत्रिक डिझेल | | | | | | | | | |
| 5• | संधाता | | | | | | | | | |
| 6• | गवंडी | | | | | | | | | |
| 7• | जोडारी | | | | | | | | | |
| 8• | कातारी | | | | | | | | | |
| 9• | यांत्रिक प्रशिक्षण व वातानुकली-करण | | | | | | | | | |

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | एकूण मंजूर विद्यार्थी संख्या | शिक्षण घेत असलेली एकूण विद्यार्थी संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1990-91 | | | | 1991-92 | | | |
| | | | एकूण विद्यार्थी | आदिवासी | एकूण विद्यार्थीनी | आदि-वासी | एकूण विद्यार्थी | आदि-वासी | एकूण विद्यार्थीनी | आदि वासी |
| .1. | .2. | .3. | .4. | .4अ. | .5. | .5अ | .6. | .6अ | .7. | .7अ. |
| 10. | वीजतंत्री | | | | | | | | | |
| 11. | तारतंत्री | | | | | | | | | |
| 12. | यांत्रिक (मोटरगाडी) | | | | | | | | | |
| 13. | आरेखक (यांत्रिकी) | | | | | | | | | |
| 14. | आरेखक (स्थापत्य) | | | | | | | | | |
| 15. | यांत्रिक (कर्षित) | | | | | | | | | |
| 16. | सर्व्हेक्षक | | | | | | | | | |
| 17. | पत्रे कारागिर (इतर नांवे लिहा) | | | | | | | | | |
| 18. | --"-- | | | | | | | | | |
| 19. | --"-- | | | | | | | | | |

## चौक क्र• 3

### मंजूर असलेली पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची संख्या

| अ•क्र | पदाचे नांव | मंजूर संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या | रिक्त असल्याची संयुक्तिक कारणे |
|---|---|---|---|---|---|
| •1• | •2• | •3• | •4• | •5• | •6• |

§ संस्थेमध्ये असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर व इतर कार्यालयीन कर्मचा-यांची माहिती वरील तक्त्यात भरावी• §

चौक क्र• 4

संस्थेच्या जागेविषयी माहिती

| | | |
|---|---|---|
| 1• | संस्थेसाठी स्वतःची प्रशासकीय इमारत आहे काय ? | :- होय / नाही |
| 2• | सदर इमारतीत वर्कशॉप, वर्ग खोल्या, वाचनालय इ• स्वतंत्र आहेत काय ? | :- होय / नाही |
| 3• | शिक्षकांसाठी व प्रशिक्षणार्थीसाठी वेगळ्या खोल्या आहेत काय ? | :- होय / नाही |
| 4• | प्रशिक्षणार्थीसाठी वसतिगृहे आहेत काय ? | :- होय / नाही |
| 5• | संस्थेच्या कर्मचा-यांसाठी राहण्या-साठी घरे आहेत काय ? | :- होय / नाही |
| 6• | संस्थेसाठी खेळाचे मैदान आहे काय ? | :- होय / नाही |
| 7• | संस्थेची इमारत नसल्यास संस्था भाडोत्री इमारतीमध्ये आहे काय? | :- होय / नाही |
| 8• | असल्यास मासिक भाडे रू• ······ | |

चौक क्र•5

संस्थेतर्फे आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी मासिक शिष्यवृत्तीची माहिती•

1• संस्थेतर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती §मासिक§

| | विद्यार्थी संख्या | संस्थेतर्फे रुपये | इतर खात्यातर्फे §नमूद करा§ रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| डेस्कॉलर | | | | |
| हॉस्टेलियर | | | | |

2• संस्थेतर्फे बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती

मासिक रु• ............

विद्यार्थी संख्या - वार्षिक रु• ...........

3• या व्यतिरिक्त इतर खाजगी संस्थेमार्फत व खात्यामार्फत मिळण्यात येणारी शिष्यवृत्ती :-

| | संख्या | मासिक रुपये | वार्षिक रुपये |
|---|---|---|---|
| अ• आदिवासी विद्यार्थी संख्या | | | |
| ब• बिगर आदिवासी विद्यार्थी संख्या | | | |

## चौक क्र· 6

विविध व्यवसायामध्ये संस्थेने प्रवेश दिलेल्या आदिवास बिगर आदिवासी तरुणांच्या गळतीबाबतची माहिती - वर्ष- 1990-91-1991-92

| विविध व्यवसायामध्ये एकूण प्रवेश दिलेल्या आदिवासी/बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या | | | | त्यापैकी व्यवसाय मध्येच सोडून दिलेल्या अथवा गळती झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | | | | टक्केवारी | | संभाव्य गळतीची कारणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1990-91 | | 1991-92 | | 1990-91 | | 1991-92 | | 1990-91 | | 1991-92 | |
| आदिवासी | बिगर आदिवासी | आदि-वासी | बिगर आदि- | आदि-वासी | बिगर-आदिवासी | आदि-वासी | बिगर-आदिवासी | आदि-वासी | बिगर-आदिवासी | आदि-वासी | बिगर आदिवासी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |

(संभाव्य गळतीची कारणे दोन्ही वर्षात वेगवेगळी असू शकतील· याशिवाय मुला-मुलींसाठी ही ती वेगळी असतील· त्यासाठी सविस्तर कारणे लिहिणे आवश्यक आहे·)

चौक क्र• 7 ﴾अ﴿

संस्थेच्या विविध व्यवसायातील आदिवासी मुलांच्या निकालाची टक्केवारी वर्ष 1990-91 व 1991-92

| अ• क्र | व्यवसायाचे नांव | आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेस बसणा-यांची संख्या | | त्यापैकी परीक्षेमध्ये पास होणा-यांची संख्या | | निकालाची टक्केवारी | | 50 टक्केपेक्षा कमी निकाल लागण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 90-91 | 91-92 | 90-91 | 91-92 | 90-91 | 91-92 | |
| •1• | •2• | •3• | •4• | •5• | •6• | •7• | •8• | |

﴾शक्य होईल त्याप्रमाणे सविस्तर कारणे नोंदविणे आवश्यक आहे•﴿

चौक क्र·7 (ब)

संस्थेच्या विविध व्यवसायातील बिगर आदिवासी मुलांच्या निकालांची आकडेवारी

वर्ष - 1990-91 व 1991-92

| अ· क्र· | व्यवसायाचे नांव | बिगर आदिवासी विद्यार्थ्यांची परीक्षेस बसणा-याची संख्या | | त्यापैकी परीक्षेमध्ये पास होणा-यांची संख्या | | निकालाची टक्केवारी | | 50 टक्के-कमी निकाल लागण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 90-91 | 91-92 | 90-91 | 91-92 | 90-91 | 91-92 | |
| ·1· | ·2· | ·3· | ·4· | ·5· | ·6· | ·7· | ·8· | ·9· |

प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, 28,क्वीन्स गार्डन, पुणे 1

आदिवासी तरुणांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व मार्गदर्शन केंद्रमार्फत प्रशिक्षण याबाबतचा मूल्यांकन अहवाल

आदिवासी तरुणांसाठी {लाभार्थी} प्रश्नावली

चौक क्र.1

मूलभूत माहिती :-

1. आदिवासी तरुणाचे संपूर्ण नांव :-

2. आदिवासी जात/जमात :-

3. जन्म तारीख :- वय ..... {पूर्ण वर्षामध्ये} शिक्षण .......

4. प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेचे नांव :-

5. कालावधी

6. अभ्यासक्रमाचे वर्णन :-

7. प्रशिक्षण कालावधीमध्ये मिळालेले मासिक विद्यावेतन रु. :- रु.

8. वसतिगृहाची सोय होती का ? :- होय / नाही

9• प्रशिक्षण कालावधीमध्ये मिळालेल्या इतर सोयी

अ• वाचनालय :- होय / नाही

ब• शैक्षणिक साहित्य :- होय / नाही

क• गणवेष
{वर्कशॉपसाठी} :- होय / नाही

ड• खेळाचे साहित्य :- होय / नाही

इ• शैक्षणिक सहल :- होय / नाही

फ• रेल्वे/एस•टी•कन्सेशन :- होय / नाही

चौक क्र.2

-----------

आदिवासी तरुणांच्या कुटुंबांबाबत माहिती :-

---------------------------

| | | |
|---|---|---|
| 1. | लाभार्थी आदिवासी तरुणाच्या घरातील माणसांची संख्या | पु ..... स्त्री ...... एकूण .... |
| 2. | आदिवासी तरुणावर अवलंबून असणा-यांची संख्या | ------------ |
| 3. | आदिवासी तरुणांच्या कुटुंबांतील पूर्वीचा व्यवसाय | शेती/नोकरी/धंदा/इतर (शेती सोडून इतर बाबी स्पष्ट कराव्यात.) |
| 3.ब. | दुय्यम व्यवसाय (नांवे द्यावे) | :- |
| 4. | आदिवासी तरुणाच्या कुटुंबांची दारिद्र्य रेषेखालील यादीत नोंद झाली आहे काय ? | :- होय / नाही |
| 5. | असल्यास वार्षिक सरासरी उत्पन्न (रुपयांमध्ये) | :- |
| 6. | आदिवासी तरुणाच्या कुटुंबांतील संख्या | :- साक्षर...... निरक्षर ...... |

## चौक क्र•3

### आदिवासी तरूणाने सुरु केलेल्या स्वयंव्यवसायाची/नोकरीची माहिती

**अ• स्वयंव्यवसायासाठी**

1• सुरु केलेल्या स्वयंव्यवसायाचे नांव नांव :-
____________________
____________________

2• व्यवसायापासून दर महिन्यास मिळणारी निव्वळ आर्थिक प्राप्ती (रूपयामध्ये)

(व्यवसायप्रित्यर्थ होणारा इतर खर्च वगळून)

3• प्रस्तुत सुरु केलेल्या व्यवसायाबद्दल आपले स्वतःचे अभिप्राय थोडक्यात सांगा•
____________________
____________________
____________________
____________________

4• प्रस्तुत व्यवसायाबाबत आपण समाधानी आहात काय ?

होय/नाही

5• औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील स्वंयव्यवसाय प्रशिक्षणाबद्दल आपले मत काय आहे ?

**(ब) नोकरीविषयक**

1• प्रशिक्षित आदिवासी तरूणाचे नोकरी मिळालेल्या उद्योगाचे नांव व पत्ता
____________________
____________________

2• नोकरी तात्पुरत्या स्वरूपाची/कायमची आहे ?

3• राहत्या गांवापासून नोकरी जेथे मिळाली आहे त्या गांवाचे नांव व अंतर (कि•मी•)
____________________
____________________

4• नोकरीमध्ये मिळणारा पगार व भत्ते इ•

5• सध्या मिळालेल्या नोकरीबाबत आपले मत अनकुल आहे काय ? होय / नाही

6• अनकुल नसेल तर इतर व्यवसायाबाबत जास्तीचे प्रशिक्षण घेण्याचा आपला मनोदय आहे काय ? असेल तर प्रशिक्षणाचे नांव व कालावधी• होय / नाही

चौक क्र• 4

---------

आदिवासी तरुणाने सुरू केलेल्या व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाबाबतची माहिती

1• आदिवासी तरुणाने कोणत्या वित्त संस्थेकडून कर्ज घेतले आहे ? :-

2• कर्जाची रक्कम रुपये :-

3• कर्जाची परतफेडीची मुदत {कालावधी} :-

4• कर्जाचा व्याजासह मासिक/वार्षिक हप्ता :-

अन्वेषकाची सही व दिनांक